# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ०९.०८.२०१९ रोजी (का.प.क्र.३४) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक ०९ ऑगस्ट २०१९ रोजी (का.प.क्र.३४) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.३० वा.वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.निपुण विनायक,भाप्रसे, नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ३. | स.स. श्रीमती सरिता अरुण बोर्डे |
| ४. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ५. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ६. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ७. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ८. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ९. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| १०. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| ११. | स.स. श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १२. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १३. | स.स. श्रीमती निकाळजे आशा विजय |
| १४. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १५. | स.स. श्रीमती दाभाडे प्रेमलता मिलींद |
| १६. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| १७. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| १८. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| १९. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २०. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २१. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |
| २२. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| २३. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| २४. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| २५. | स.स. श्रीमती नसीम बी सांडु खॉ |
| २६. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| २७. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |

| | |
|---|---|
| २८. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| २९. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ३०. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ३१. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ३२. | स.स. श्रीमती गादगे शितल विरभद्र |
| ३३. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ३४. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ३५. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ३६. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ३७. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ३८. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ३९. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ४०. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ४१. | स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे |
| ४२. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ४३. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ४४. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ४५. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ४६. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ४७. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ४८. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ४९. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
३. श्री.अबुल हसन अली खुर्रम अली हाशमी

मा.महापौर :आज क्रांतीदिन आहे. ज्या शुरवीरांनी देशासाठी बलिदान दिले. त्या सर्व शुरवीरांना अभिवादन.

श्री.विकास जैन :माजी परराष्ट्रमंत्री व भाजपा पक्षाच्या नेत्या स्व.सुषमा स्वराज यांचे दु:खद निधन झाले. त्यांनी देशासाठी जे कार्य केले. ते उल्लेखनीय आहे. त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

(या ठरावास स.श्री.राजगौरव वानखेडे, स.श्रीमती सरिता अरूण बोर्डे, स.सीताराम सुरे, स.बन्सी जाधव यांनी अनुमोदन दिले.)

मा.महापौर :देशातच नव्हे तर सर्व परदेशातही त्यांनी आपल्या वक्तृत्व शैलीने जगाच्या नकाशावर भारताला नाव मिळवून दिले. असे व्यक्तीमत्व असलेल्या व भारतीय जनता पार्टीच्या नेत्या व देशाच्या माजी परराष्ट्रमंत्री स्व.सुषमा स्वराज यांचे नुकतेच निधन झाले त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

श्री.राजगौरव वानखेडे:सांगली मध्ये महापुरात बोट उलटून १४ लोकांचा मृत्यू झाला. त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

मा.महापौर :सर्वानी श्रध्दांजली अर्पण करणेसाठी उभे रहावे.

यावेळी स्व.सुषमा स्वराज व सांगली येथे बोटीतून पडून पाण्यात बुडालेल्या व मृत्यू झालेल्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

श्री.राजगौरव वानखेडे:काश्मिर संदर्भात ३७० जे कलम लागू होते ते केंद्र शासनाने रद्द केले. मागिल ७० वर्षापासून विविध नेत्यांची व नागरीकांची इच्छा होती. जनभावनेचा विचार, आदर करून ते कलम हटविण्याचे काम मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी व मा.अमीत शहा असतील व पक्षातील नेते यांनी सहकार्य केले. या सर्वाचे अभिनंदनाचा ठराव पारीत करावा.

श्री.विकास जैन :कलम ३७० असेल ३५-अे असेल या बाबत कार्यवाही केली ही इच्छा स्व.बाळासाहेब ठाकरे, स्व.अटलबिहारी वाजपेयी यांची पण इच्छा होती. ज्या पध्दतीने मा.पंतप्रधान व गृहमंत्री यांनी करून दाखवले व त्यांना सहकार्य करणारे सर्व युती सरकारचे खासदार व नेते असतील त्या सर्वाचे अभिनंदन करण्यात यावे.

श्री.आत्माराम पवार :७२ वर्षात ४२ हजार सैनिक त्या भागात मृत्यूमुखी झाले आहे. ३७० कलम रद्द केले. त्याबद्दल मा.पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी मा.श्री.अमीत शहा व श्री.उध्दवजी ठाकरे या सर्वाचे सहकार्य लाभले अभिनंदन करावे.

श्री.रामेश्वर भादवे :भाजपा पक्षाने त्यांचे जाहीरनाम्यात हे दिले होते त्यानुसार करूनही दाखवले जो प्रस्ताव मांडला तो मंजूर करावा.

श्री.विजय औताडे :मा.पंतप्रधान व केंद्रीय गृहमंत्री यांनी हा धाडसी निर्णय घेतला. पहिल्यांदा तीन तलाक बाबत, नंतर चांद्रयान असेल व आता ३७० कलम व ३५-अ बाबत मा.पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी साहेब यांचे सरकारने निर्णय घेतला. ज्या दिवशी निर्णय झाला. तो सुवर्ण अक्षरात लिहिण्यासारखा दिवस होता. सन-१९५२ मध्ये शामा प्रसाद मुखर्जी यांनी एक देश एक नियम, एक देश एक झेंडा अशी संकल्पना मांडली होती, परंतु मागिल ७२ वर्षात जे सरकार होते ते सरकार हा निर्णय घेऊ शकले नाही, परंतु आता श्री.नरेंद्र मोदी साहेब यांनी हा चांगला निर्णय देशासाठी घेतला. जेंव्हा १५ ऑगस्टला काश्मिर मध्ये तिरंगा झेंडा फडकेल तेंव्हा स्व.शामा प्रसाद मुखर्जी व दिनदयाळ शर्मा यांना खऱ्या अर्थाने श्रध्दांजली ठरेल. जो अभिनंदनाचा ठराव ठेवला त्यास अनुमोदन आहे.

मा.महापौर :शिवसेना, भारतीय जनता पार्टी व एनडीएचे सरकार मा.मोदी साहेबांच्या नेतृत्वाखाली काम करीत आहे स्व.बाळासाहेब ठाकरे व स्व.अटलबिहारी वाजपेयी व संपुर्ण देशाचे स्वप्न हे कलम हटविल्याने पुर्ण झाले. ३७० कलम रद्द झाले. हा धाडसी निर्णय सरकारने घेतला जे कुणी करू शकले नाही ते एनडीए सरकारने करून दाखवले. एक देश एक झेंडा ७२ व्या वर्षी १५ ऑगस्टला स्वातंत्र्य दिनी तेथे झेंडा फडकेल. त्यावेळी या देशातील सर्व नागरीकांसाठी ही एक अभिमानाची बाब आहे हा धाडसी निर्णय मा.पंतप्रधान मोदी साहेब, मा.अमित शहा, मा.उध्दवजी ठाकरे, मा.आदित्य ठाकरे व सरकार मधील शिवसेना व युती

पक्षातील सर्व सहकारी यांचे सहकार्य लाभले या सर्वाचे अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात येतो. हे सभागृह या निर्णयाचे अभिनंदन करते. पावसाळ्याचे दिवस चालू आहे. शहरात मोडकळीस आलेल्या इमारती व नाल्यातील पाणी लोकांच्या घरात जाऊ नये याची प्रशासनाने दखल घ्यावी. औरंगाबाद-जालना स्थानिक स्वराज्य विधान परिषद मतदार संघाची निवडणूक-२०१९ ची आदर्श आचारसंहिता चालू असल्याने कोणताही निर्णय व चर्चा करणे योग्य नाही. त्यामुळे आजची सभा तहकूब करण्यात येते.

या बरोबरच सभा राष्ट्रगिताने तहकूब केल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

**स्वाक्षरित/-**
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

**स्वाक्षरित/-**
महापौर
महानगरपालिका औरंगाबाद